युनिट 2

## विधानसभा

प्र. 1. विधानसभेची रचना स्पष्ट करून अधिकार आणि कार्याने वर्णन करा ? ( 16 **mark** )

उत्तर :– भारतीय संघराज्यात केंद्राप्रमाणे घटकराज्यातही सासंदिय शासनपद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. त्या अनुशंगाने घटकराज्यामध्ये विधिविषयक कार्य पार पाडण्यासाठी एक विधिमंडळ राहील असे म्हटले आहे. या प्रथेला अनुसरून भारतीय संविधानाच्या 168 साव्या कलमानुसार प्रत्येक घटकराज्यात विधानसभा, विधानपरीषद आणि राज्यपाल यांचे मिळून एक विधिमंडळ राहील, असे म्हटले आहे. पण तरीदेखोल भारतीय संघराज्यातील सर्वच घटकराज्यात विधानपरीषद नाही केवळ 29 पैकी 7 घटकराज्यात विधिमंडळाचे द्वितीयसदन विधानपरीषद आहे. ही घटकराज्ये म्हणजे, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, जम्मू आणि काश्मीर, बिहार, कर्नाटक आणि तेलगणा. महाराष्ट्रात द्विगृही विधिमंडळ असुन या सभागृहाची विधानसभा. आणि विधानपरीषद ही दोन सभागृहे आहेत. या सभागृहाची रचना आणि कार्ये पुढीलप्रमाणे आहेत. विधानसभा हे राज्यविधिमंडळाचे लोकप्रतिनिधीक सभागृह आहे. या सभागृहात राज्यातील मतदारानी प्रत्यक्ष निवडणुकीनी निवडुण दिलेले प्रतिनीधी राहतील. ज्या राज्यात विधिमंडळाची दोन सभागृहे आहेत. त्या राज्यात विधानसभा हे विधिमंडळाचे कनिष्ठ सभागृह सांगितले जाते. मात्र अधिकारांच्या दृष्टीने हे सदन अतिशय शक्तीशाली असते. म्हणुन जरी नावाने ते कनिष्ठ असते तरी अधिकारांच्या दृष्टीने ते सर्वश्रेष्ठ ठरते. ज्या घटकराज्यामध्ये केवळ एकगृही विधीमंडळ आहे. त्या घटकराज्यामध्ये विधानसभा हे सर्वशक्तीशाली सदन ठरते. विधानसभेच्या रचनेचा विचार खालील मुद्दयाच्या आधारे करता येतो.

रचना

1) सभासद संख्या :– घटनेच्या कलम 170 नुसार विधानसभेत जास्तीत जास्त 400 व कमीत कमी 60 सभासद असतात. परंतु घटनेच्या कलम 371 मध्ये दुरूस्ती करून सिक्कीम, अरूणाचल प्रदेश गोवा या सारख्या छोटया घटकराज्यात कमी सदस्य संख्येची अट आणखी शितील करण्यात आली असुन ती 30 ते 40 इतक्या सदस्य संख्येवर आण्यात आली आहे.

प्रत्येक घटकराज्याच्या लोकसंख्येच्या आधारावर त्या घटकराज्याच्या विधानसभेची सदस्य संख्या ठरवली जाते. त्यामुळे प्रत्येक घटकराज्याच्या विधानसभेची संख्या ही वेगळी असलेली येते. महाराष्ट्राच्या विधानसभेच्या सदस्याची संख्या 288 इतकी आहे.

2) निवडणुका व प्रतिनिधीत्व :–

विधानसभा सदस्यांची निवडणुक प्रादेशिक प्रतिनिधीत्वाच्या एकप्रतिनीधी मतदारसंघाद्वारा घेतली जाते विधानसभेत जितके सदस्य निवडून दयायचे असतील तितके मतदारसंघ राज्यात पाडले जातात. आणि संपुर्ण राज्यात प्रत्येक राज्यात निवडून दयायचे प्रतिनीधी आणि मतदार संघाची लोकसंख्या यात सारखे प्रमाण राहील यावर भर दिला जातो. साधारणपणे 1,00,000

लाख लोकसंख्येला एक प्रतिनीधी असे मतदार संघ पाडले जातात. दर दहा वर्षानी शिरगीनतीनुसार या प्रमाणात बदल होते.

3) सार्वत्रिक प्रौढ मताधिकारांच्या तत्वानुसार प्रत्यक्ष व गुप्त मतदान पद्धतीने प्रतिनिधी निवडले जातात

. वयाची 18 वर्ष पूर्ण करणाऱ्या स्त्रो–पुरूषाला मतदानाचा अधिकार असतो. आणि बहुमताच्या पद्धतीने प्रतिनीधी निवडून आणले जातात. तसेच प्रत्येक घटकराज्याच्या विधानसभेत अनुसूचीत जाती–जमातीसाठी काही जागा राखीव ठेवल्या जातात. तसेच ॲंग्लो इंडियन जमातीला प्रतिनिधीत्व न मिळाल्यास राज्यपाल ॲंग्लो इंडियन जमातीचा एक प्रतिनिधी राज्यपालाद्वारा विधिमंडळात निवडून पाठवितो.

4. सदस्यतत्वासाठी असलेली पात्रता :– 1) तो भारताचा नागरीक असावा. 2) त्याने वयाची 25 वर्ष पूर्ण केलेली असावी शिवाय ससंदेने वेळोवेळी कायदा करून ठरवलेल्या अटी व सेवाशर्ती पूर्ण केलेल्या व्यक्ती या निवडणुकीसाठी उभ्या राहू शकतात. 3) तसेच तो सरकारी नोकरी करणारा नसावा. 4) तो वेडा पागल नसावा 5) तो परकीय नागरीक नसावा. तसेच संसदेने वेळोवेळी कायदा करून ठरवलेली पात्रता त्याच्या अंगी असावी.

5) कार्यकाल :–

1) विधानसभेचा कार्यकाल हा 5 वर्षांचा असतो. जर देशामध्ये आणीबाणी जाहीर करण्यात आली तर कायदा करून ससंद एका वेळेस एक वर्ष या प्रमाणे कायदा करून तो वाढण्यात येतो. तसेच आणीबाणी संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत निवडणुका घ्याव्या लागतात. तसेच विशिष्ट परीस्थितीत विधानसभेचा कार्यकाल संपण्या अगोदर विधानसभा विसर्जित करून कमी करता येतो.

6) विधानसभेचा अध्यक्ष :–

विधानसभेचे कामकाज चालविण्यासाठी विधानसभा सदस्य आपल्यामधून एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणुन निवड करतात. याचा कार्यकाल विधानसभे ऐवढाच परंतु विधानसभचे विसर्जन झाल्यानंतर नविन विधानसभा तयार होत नाही. त्यासाठी निवडणुका होत नाही व निवडणुकीत निवडून येऊन नविन अध्यक्ष व उपाअध्यक्ष हा जो पर्यंत निवडून येत नाही. तोपर्यंत जुनेच अध्यक्ष राहतात. तसेच विधानसभा अध्यक्षाचा अकाली मृत्यू झाल्यास तसेच विधानसभेचे अध्यक्ष बहुमताने अविश्वासाचा ठराव पारीत करून विधानसभा अध्यपक्षाला कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर पदावरून काढून टाकू शकतात. परंतु या ठरावाची सुचना चौदा दिवस आधी त्यांना सभागृहाना दयावी लागते. राज्यविधीमंडळ ठरवेल तेवढे वेतन व भत्ते व अन्य सोयी विधानसभा अध्यक्षाला विधिमंडळ ठरवेल त्याप्रमाणे मिळतात. विधानसभा अध्यक्षाने निपक्षःपातीपणे कार्य करावे अशी त्याच्याकडून अपेक्षा असते.

विधानसभेच्या अध्यक्षाची कार्येः– विधानसभेच्या अध्यक्षाला सभागृहांचा प्रमुख या नात्याने खालील कार्य पार पाडावी लागतात.

1) सभागृहांचे नेतृत्व करणे सभागृहांचे अध्यक्ष स्थान भुषविणे व सभागृहांचे कामकाज शातंतामय मार्गाने चालवणे

2) सभागृहांच्या कामकाजाचे नियम तयार करणे व त्याची अमंलबजावणी करणे.

3) विधानसभेत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे. सदस्याना सभागृहांत भाषण करणे प्रश्न विचारणे ठराव व सुचक मांडणे यासाठी परवांनगी देणे सभागृहात वेगवेगळया कामाला चर्चेसाठी कितीवेळ दयावा हे ठरवणे. तसेच एखादया ठरावावर सभागृहात समसमान मते पडल्यास निर्णयांक मत देणे

4) सभागृहांच्या कामकाजाचे उल्लंघन करणाऱ्या सदस्यांना निलंबित करणे.

5) एखादे विधयक धनविधयक आहे की नाही ठरवणे. याबाबतीत त्याचा निर्णय अंतिम स्वरूपाचा असते.

6) तसेच गणसंख्येच्या अभावी कामकाज तहकूब करणे.

7) एखादया सदस्याला मातृभाषेतून भाषण करण्याची परवानगी देणे.

8) तसेच सभागृहांचे आणि सभागृहातील सदस्यांच्या विशेषाधिकारांचे संरक्षण करणे.

उपाअध्यक्ष :—

अध्यक्षाच्या अनुपस्थितीत सदनांचे कामकाज पाहण्यासाठी अध्यक्षाच्या निवडीच्या वेळेस सदस्य आपल्यामधून एकाची उपाअध्यक्ष म्हणुन निवड करतात. याचा देखोल कार्यकाल अध्यक्षाऐवढाच म्हणजे 5 वर्षाचा असतो. कार्यकाल संपन्याअगोदर तो आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो. किंवा सभागृहाचे सभासद 14 दिवस आदी पूर्व सूचना देऊन त्याच्यावर अविश्वासाचा ठराव आणून त्याला पदावरून काढून टाकू शकतात. राज्यविधिमंडळाने ठरवलेले वेतन, भत्ते, आणि सोयी त्याला उपलब्ध करून दिल्या जातात. व अध्यक्षाच्या अनुपस्थितीत त्याला करावी लागणारी कामे उपाअध्यक्ष पाहतो. तेव्हा त्याला अध्यक्षाचे सर्व अधिकार प्राप्त होतात. अध्यक्षाच्या आकस्मीक मृत्यूनंतर त्याला अध्यक्षा म्हणुन कार्य करावे लागतात.

अधिवेशने :—

साधारणपणे घटनेनुसार विधानसभेची वर्षातून 2 अधिवेशने झाली पाहिजे. असे बंधन आहे. परंतु आवश्यकता वाटल्यास राज्यपाल विधानसभेचे ज्यादा अधिवेशन बोलवू शकतो अधिवेशन स्थगीत करणे. अधिवेशनाची सुरूवात करून देणे. कार्यकाल संपल्यापूर्वी विधानसभेचे विसर्जन करणे ही सर्व कामे राज्यपालाद्वारा केली जाते. महाराष्ट्राच्या विधानसभेची वर्षातून तीन अधिवेशने होतात.

गणसंख्या किंवा कोरम :—

विधानसभेचे सभासद कामकाज चालू होण्यासाठी विशिष्ट संख्येने उपस्थित असणे आवश्यक असतात त्याला कोरम असे म्हणतात. विधिमंडळ कायदा करून जोपर्यंत ठरवत नाही तोपर्यंत

एकुण सभासद संख्येच्या 1/10 किंवा 10 यापैकी जी संख्या जास्त असेल ती सदस्य संख्या सदनामध्ये उपस्थित असल्यास कामकाज चालू होते.

सभासदाचे विशेषाधिकार :–

सदनातील सभासदाना घटनेनुसार काही विशेषाधिकार प्रदान करण्यात आले आहे. जसे अर्निबंध भाषण स्वातंत्र्य तसेच त्यांने सभागृहात मांडलेल्या विचारावर किंवा अहवालातून प्रसिद्ध केलेल्या माहितीवर कोणत्याही न्यायालयात खटला भरता येत नाही. तसेच दिवाणी–दाव्यासाठी कोणत्याही सदस्याला अटक करता येत नाही. परंतु फौजदारी दाव्यासंबंधोचा गंभीर गुन्हा किंवा प्रतिबंधक स्थानबद्धता या कायदयाखालील त्याला अटक करण्यात आली असल्यास तशी ताबडतोब सुचना सभापतीला दयावी लागते. तसेच सभापतीच्या परवानगी शिवाय विधिमंडळाच्या परीसरात कोणत्याही सभासदाला अटक करता येत नाही. तसेच 40 दिवस आधी व 40 दि. नंतर त्याला अटक करता येत नाही. विधिमंडळाची पदप्रतिष्ठा करणाऱ्याला न्यायालय शिक्षा न देता विधिमंडळ स्वतः शिक्षा देते. सभागृहाच्या संदर्भातील सर्व नियम व सभागृहातील सदस्यांचे विशेषाधिकार ठरविण्याचा अधिकार विधिमंडळाला आहे. तसेच विधिमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते तसेच विधिमंडळाच्या कामकाजाचे नियम व सत्ता यामध्ये बदल करण्याचा अधिकार विधीमंडळाला आहे.

विधानसभेचे अधिकार :–

अधिकारांच्या संदर्भात राज्यसूचीतील आणि समर्वतीसुचीतील विषयावर कायदे करण्याची सत्ता विधानसभेला आहे. त्याबरोबरच अर्थविषयक आणि कार्यकारी क्षेत्रात देखील महत्वाचे अधिकार विधानसभेला आहे. भारतीय संघराज्यातील 29 घटक राज्यापैकी 7 घटक राज्य सोडल्यास इतर 22 घटक राज्यामध्ये विधानसभा हे एकच विधीमंडळाचे सदन आहे. व ते शक्तीशाली असलेले दिसुन येते. मात्र जिथे विधीमंडळाचे दोन सभागृह तिथे देखील विधानसभा सर्वश्रेष्ठ असुन विधानपरीषदेला नगण्य स्वरूपाचे अधिकार आहे. म्हणुन केंद्रात लोकसभेचे अधिकारांच्या संदर्भात जे स्थान तेच राज्यात विधानसभेचे दिसुन येते. विधानसभेचे दिसुन येते. विधानसभेला यातील विविध क्षेत्रात अधिकार प्राप्त झालेले आहेत.

1) विधिविषयक अधिकार :–

राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा अधिकार विधानसभेला आहे. मात्र समर्वती सुचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार जरी विधानसभेला असला अधिकार केंद्राला देखील असल्यामुळे जर समर्वती सूचीतील विषयावरील राज्याचा कायदा केंद्राला विरोधी जाणारा असला तर राज्याचा कायदा रद्द होतो. मात्र समर्वती सूचीतील विषयावर केलेल्या कायदयाला जर राष्ट्रपतीची समंती मिळाली असेल जर संसदेने केलेल्या कायदयाच्या विरोधात जाणारा असला तरी देखील तो रद्द होत नाही ज्या राज्यामध्ये विधीमंडळाची दोन सभागृहे आहेत त्या राज्यात विधिविषयक क्षेत्रात केवळ विधानसभेला विशेष महत्व असलेले दिसुन येते. एखादया विधयकाचे कायदयात रूपांतर होण्यासाठी दोन्ही सभागृहांची म्हणजेच विधानसभा आणि विधानपरीषदेची मंजूरी आवश्यक असली तरी सर्वसामान्य विधेयकाच्या बाबतीत विधानपरीषद

केवळ तीन महिन्यापर्यंत विलंब लावू शकते मात्र तीन महिन्यानंतर आहे त्या स्वरूपात विधानसभेने पुन्हा विधेयक मंजुर केल्यास एक महिन्याच्या आत विधानपरीषदेला त्याला मंजूरी दयावीच लागते. अन्यथा त्याच्या मंजूरी शिवाय हे विधयक मंजूर झाले असे समजले जाते. सामान्य विधेयकाची सरूवात कोणत्याही सभागृहात होऊ शकते. मात्र धनविधेयकांचा प्रारंभ विधानसभेतच करावा लागतो. अर्थविधयकांच्या बाबतीत विधानसभेचे अधिकार अतिशय नगण्य स्वरूपाचे आहे. विधानसभेने धनविधेयक मंजूर करून विधानपरीषदेकडे पाठविले तर त्यावर 14 दिवसाच्या आत विधानपरीषदेला आपला निर्णय कळवावा लागतो. विधानपरीषदेने विधेयक नाकारले असेल, किंवा त्यात काही दुरूसत्या सुचवून ते तसेच पडून राहू दिले असतील तर 14 दिवसानंतर ते विधानसभेला मान्य आहे. असे समजले जाते. आणि राज्यपालाच्या स्वाक्षरीसाठी पाठवले जाते. व त्यांचे कायदयात रूपांतर होते.

2) शासनविषयक किंवा कार्यकारी अधिकारी :–

राज्याचे कार्यकारी मंडळ राज्यविधिमंडळ अर्थात विधानसभेला जबाबदार असते. ज्या पक्षाला विधानसभत बहुमत असते. त्या पक्षाच्या नेत्याच्या नेतृत्वाखाली विधिमंडळाला काम करावे लागते. मंत्रिमंडळाला आपल्या प्रत्येक कार्यासाठी विधानसभेची मंजूरी घ्यावी लागते. विधानसभा सदस्य मंत्रिमंडळातीचा मंत्र्याना त्यांच्या राज्यकारभाराबाबत प्रश्न व उपप्रशन विचारू शकतात चौकशी करू शकतात सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मंत्रिमंडळाला दयावी लागते. अन्यथा काम बंद ठराव, निंदाजनक ठराव, लक्षवेधी सुचना, कपात इत्यादी ठराव विधानसभेत आणून मंत्रिमंडळाचे कामकाज विधानसभा सदस्य बंद पाडू शकतात. तसेच जोपर्यंत विधानसभेचा विश्वास आहे. तोपर्यंतच मंत्रिमंडळ अधिकार पदावर राहू शकते. विधानसभेन मंत्रिमंडळा विरूद्‌ध अविश्वासाचा ठराव पारीत केल्यास मंत्रिमंडळ बरखास्त होते. असा ठराव मांडण्याचा अधिकार मात्र विधानसभेला नाही.

3) अर्थविषयक किंवा वित्तीय अधिकार :–

राज्याच्या अर्थव्यवहारावर विधानसभेचे पूर्ण नियंत्रण असते. सर्व धनविधेयके विधानसभेतच प्रथम मांडावी लागतात. वार्षीक अर्थ संकल्प हा विधानसभेमध्ये सादर केला जातो. आणि विधानसभेच्या मंजूरी शिवाय कोणते ही कर लावता येत नाही. कोणतेही कर वसुल करता येत नाही. ‘शासनाच्या विविध विभागावर जो पैसा खर्च करायचा आहे. त्यासाठी तसेच मंत्रिमंडळाकडून निरनिराळया कारणांसाठी जो खर्च केला जातो. त्याचा हिशोब विधानसभे समोर त्यांना सादर करावा लागतो. त्या हिशोबाची आणि राज्याच्या नियंत्रक महालेखा परीक्षकांने सादर केलेल्या अहवालाचे छाननो करण्याचे काम विधानसभा करीत असते. तसेच राज्याच्या संचीत निधीतून व आकस्मीक खर्चनिधोतून झालेल्या खर्चाला विधानसभेची मंजूरी घ्यावी लागते. याशिवाय मंत्रिमंडळाकडून आणलेले कर प्रस्ताव, विधानसभेने नामंज्र केले किंवा त्यात कपात

केली तर मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव विधानसभा मांडते. आर्थीक क्षेत्रात मात्र विधानपरीषदेला असे अधिकार नाही.

4) घटना दुरूस्तीविषयक अधिकार :–

तसे पाहता घटनेत दुरूस्ती करण्याचे अधिकार हे संसदेला आहे. घटनेच्या अधिकांश भागात संसदच दुरूस्ती करू शकते. परंतु घटना दुरूस्तीमधल्या काही बाबी अशा आहेत की ज्यात दुरूस्ती करण्यासाठी संसदेच्या विशिष्ट बहुमतासोबत अर्ध्यापेक्षा जास्त घटकराज्याची समंती घेणे आवश्यक असते. आणि संसदेने विशिष्ट बहुमताने अशा बाबी संबंधात दुरूस्तीकरण्या संबंधीचे विधेयक मंजूर केल्यानंतर ते घटक राज्याकडे पाठविले जाते. अर्थात घटक राज्याची विधानसभाच त्या घटनादुरूस्ती विधेयकावर काम करते. एखादे घटनादुरूस्ती विधेयक विधानसभेकडे आल्यानंतर त्यावर विचार करायचा की नाही. विचार करण्यासाठी किती कालावधी घ्यायचा हे सर्व राज्यविधिमंडळावर अवलंबून असते. याबाबत घटनेचे बंधन नाही. घटक राज्याची सीमा व नावात बदल करणारे विधेयक संबंधीत घटक राज्याच्या विधानसभेकडे पाठविण्याचा अधिकार राष्ट्रपतीचा आहे.

5) इतर कार्ये :–

याशिवाय विधानसभेच्या सदस्यांना या अधिकाराव्यतिरीक्त अनेक कार्य करावी लागतात. जसे राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतदान करणे. पण केवळ विधानसभेतील निर्वाचित सदस्यच हे मतदान करू शकतात. तसेच विधानसभेचे सदस्य आपले प्रतिनिधी राज्यसभेत निवडून पाठवतात अर्थात या दोन्ही कार्यामध्ये विधानसभा सदस्यांना सहभागी होता येत नाही. याशिवाय नागरीकांच्या समस्या व प्रश्न यांना वाचा फोडणे. तसेच राज्याचे हित सुरक्षित ठेवणे, ही जबाबदारी विधान सभेवर असते.

वरीलप्रमाणे विधानसभेला काही कार्य करावी लागत असली तरी राज्यविधीमंडळाच्या अधिकारावर अनेक मर्यादा आलेल्या दिसुन येतात. राज्याच्या कार्यक्षेत्रात विधानसभेची सत्ता अर्निबंध किंवा अमर्यादीत स्वरूपाची नाही. जसे काही विधेयके राष्ट्रपतीच्या परवांनगीशिवाय राज्यविधीमंडळात चर्चेसाठी येऊ शकत नाही. जसे आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण लावणारे विधयेक तसेच काही अशी विधियके आहेत की जी राज्यविधीमंडळाने मंजूर केल्यानंतर तिला राष्ट्रपतीची समंती मिळणे आवश्यक असते. जसे जीवनाआवश्यक वस्तु खरेदी–विकी अशा वस्तु राज्याबाहेर पाठवण्यावर बंदी, सार्वजनिक कार्यासाठी खाजगी संपत्ती ताब्यात घेणे इत्यादी तसेच

राज्यविधीमंडळाने मंजूर केलेले एखादे विधेयक राज्यपाल स्वतःच्या अधिकारात राष्ट्रपतीच्या समंतीसाठी पाठवू शकतो आणि राष्ट्रपतीने समंती नाकारल्यास विधेयक रद्द होते. तसे आणीबाणोच्या परीस्थितीत कलम 240 नुसार राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर कायदा करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होतो. तसेच राष्ट्रपती राजवटीच्या काळात राज्यविधीमंडळ स्थगित केले जाते. किंवा विधानसभेचे विसर्जन केले जाऊ शकते राज्यसूचीतील एखादया विषयावर संसदेने कायदा करावा, असा ठराव राज्यसभेने मंजूर केल्यास संसदेला त्या विषयावर कायदा करता येतो. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या कार्यावर राज्यविधीमंडळात चर्चा होऊ शकत नाही. भारत सरकारनी परराष्ट्रासोबत केलेल्या कोणत्याही तह कराराच्या अमंलबजावणीसाठी ससंद राज्यसूचीतील विषयावर कायदा करू शकते. वरीलप्रमाणे अधिकार पाहिल्यानंतर राज्यविधानसभा सर्वश्रेष्ठ नाही. असे जरी. म्हटल्या जात असले तरी विधिविषयक अधिकांराबाबत धनविधयकांच्या बाबतीत मंत्रीमंडळावर असलेल्या नियंत्रणाच्या बाबतीत व विधानपरीषदेची निर्मीती करणे. आणि राष्ट्रपती आणि राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळेस केवळ विधानसभेला असलेला मतदानाचा अधिकार पाहता, राज्यविधीमंडळामध्ये विधानसभेचे स्थान सर्वश्रेष्ठच आहे, असे म्हणावे लागते.

## विधानपरीषद

प्र. 1 :– विधानपरीषदेचे रचना, अधिकार आणि कार्य स्पष्ट करा ?

( 16 मार्क )

विधानपरीषद हे राज्यविधीमंडळाचे वरीष्ठ आणि द्वितिय सदन आहे. परंतु भारतातील सर्वच घटक राज्यामध्ये विधानपरीषद अस्तित्वात नाही. फक्त 7 घटक राज्यामध्ये विधानपरीषद अस्तित्वात आहे. उत्तरप्रदेश महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, बिहार, जम्मूकाश्मीर, आंध्रप्रदेश अर्थात ज्या राज्यामध्ये विधीमंडळाचे एकच सदन म्हणजे विधानसभा आहे. त्या राज्यात द्वितीय सदन हवे किंवा नाही. याबाबतचा निर्णय विधानसभेने ठराव करून, ससंदेला विनंती करून घ्यायचा असतो. विधानपरीषदेची रचना पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1) सभासद संख्या :–

कलम 169 नुसार विधानपरीषदेची सभासद संख्या कमीत कमी 40 जास्तीत जास्त त्या राज्यातील विधानसभेच्या एकुण सभासद संख्येच्या 1 तृतीयांश इतकी असावी असे ठरवण्यात आले आहे. त्यामुळे विधानपरीषद असलेल्या प्रत्येक घटक राज्यामध्ये ही सदस्य संख्या वेगवेगळी आढळले. उदा. महाराष्ट्रात सदस्य संख्या 68 असतात. बिहार मध्ये 96 उत्तरप्रदेशमध्ये 108, कर्नाटकात 63, आणि जम्मूकाश्मीरच्या विधानसभेत 40 सदस्य असतात. विधानपरीषदेतील काही सभासद अप्रत्यक्षपणे तर काही सभासद विशिष्ट हितसंबंधी वर्गाकडून निवडले जातात. तर काही सभासद राज्यपाल नियुक्त करतो. विधानपरीषदेतील 1/3 सभासद त्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाकडून निवडून दिले जाते. हे 1/12 सभासद त्या राज्यातील शिक्षकाकडून निवडून दिले जातात. 1/12 सभासद त्या राज्यातील पदवीधराकडून निवडून दिले जातात. 1/3 सभासद त्या राज्यातील विधानसभेच्या सभासदाकडून निवडून दिले जाते. आणि उरलेले 1/6 सभासद राज्यपाल  नियुक्त करतो , साहित्य, कला, विज्ञान, समाजसेवा इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगीरी बजावणाऱ्या व्यक्तीमधून राज्यपाल ही नियुक्ती करतो. महाराष्ट्रात विधानपरीषदेची रचना याच पद्धतीने करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानपरीषदेच्या 78 सभासदांपैकी 39 सभासद विधानसभेकडून, 29 सभासद स्थानिक स्वराज्य संस्थांकडून, 7 सभासद शिक्षक व 7 सभासद पद्वीधराकडून निवडून दिले जातात. आणि 12 सभासद राज्यपाल नियुक्त करतो. साहित्य, कला, विज्ञान व तंत्रज्ञान समाजसेवा इ. क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीच्या ज्ञानाचा व योग्यतेचा फायदा राज्याला  मिळावा, या हेतूने या 12 सभासदांची निवड केली जाते.

2) निवडणुक :–

विधानपरीषदेच्या सभासदांची निवड प्रमाणबद्ध प्रतिनिधीतत्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार घेतली जाते. दर दोन वर्षांनी 1/3 सभासदांसाठी निवडणुका होतात. त्यासाठी प्रादेशिक आधारावर बहु प्रतिनीधी मतदार संघ काढले जातात. आणि हे मतदारसंघ विधानपरीषदेत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या मतदाराच्या वर्गवारी पाडले जातात. जसे, स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदारसंघ शिक्षकाचा मतदारसंघ, पदवीधरांचा मतदारसंघ इत्यादी. मतदान करत असताना सभासदांना पसंती कमांक दयावा लागतो. मतदान झाल्यानंतर विशिष्ट सुत्रांच्या साहाय्याने कोटा निधारीत केला जातो. त्यानंतर मतमोजणोला प्रारंभ होतो. पहिल्या पसंतीची मते मोजली जातात. आणि कोटा पूर्ण झालेला उमेद्वार विजयी घोषीत केला जातो. जर कोटा पूर्ण झाला नसेल तर दुसऱ्या पसंतीची मते मोजून ती उरलेल्या उमेद्वाराच्या पहिल्या

पसंतीच्या मतामध्ये मिळवीली जाते. अशा पद्धतीने कोटा पूर्ण करणारा उमेद्वार निवडून आल्याचे जाहीर केले जाते. अशा पद्धतीने कोटा पूर्ण करण्यासाठी पहिल्या पसंतीची दुसऱ्या पसंतीची तिसऱ्या पसंतीची व चौथ्या पसंतीची असा कम तोपर्यंत चालू राहतो. जोपर्यंत उमेद्वार निवडून येत नाही. अशा पद्धतीने उमेद्वार निवडून दिला जातो.

3) कार्यकाल :–

विधानपरीषदेचा कार्यकाल हा वैशिष्टपूर्ण आहे. विधानपरीषद हे राज्यविधीमंडळाचे कायम आणि सातत्य असणारे सभागृह आहे. या सभागृहांचे सर्व सदस्य एकाच वेळी नियुक्त होत नाही तर दर 2 वर्षांनी सभागृहांची 1/3 सदस्य निवृत्त होतात. आणि त्यांच्या जागी नविन सभासदांची निवड केली जाते. त्यामुळे प्रत्येक सदस्याला 6 वर्षांचा कार्यकाल उपभोगायला मिळतो. त्यामुळे सभागृहात कार्यकालाबाबत सातत्य कायम राहते. विधानसभेचे विर्सजन झाले असेल तर राज्यपालाला कायदेविषयक सल्ला देता यावा, यासाठी या सभागृहाला स्थायी ठेवण्यात आले आहे.

4) पात्रता :–

विधानपरीषद सदस्यासाठी खालील पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

1) तो भारताचा नागरीक नसावा.

2) त्याने वयाची 30 वर्षे पूर्ण केलेली असावी

3) ससंदेने वेळोवेळी कायदा करून ठरवलेली

4) पात्रता त्याच्या अंगी असावी. तो व्यक्ती केंद्र किंवा राज्यसरकारच्या पदंरी चाकरी करणारा नसावा. आणि निवडून आल्यानंतर असला तर त्याने राजीनामा दयावा. परकीय नागरीक विधानपरीषदेचा सदस्य होऊ शकत नाही. ससंदेने कायदा करून ज्यांना अपात्र ठरवलेले आहे. अशा व्यक्ती विधानपरीषदेच्या सदस्य राहू शकत नाही.

5) पदाधिकारी :–

विधानपरीषदेचे कामकाज चालविण्यासाठी आपल्यातून एकाची सदस्य सभापती म्हणून निवड करतात तर एकाची उपसभापती म्हणुन निवड करतात. सभापतीचा कार्यकाल 6 वर्षाचा असतो. त्यांचा कार्यकाल जरी 6 वर्षाचा असला तरी नविन सभापतीची निवड होई पर्यंत तो सभापती म्हणून पदावर कायम राहतो. सभापतीच्या अनुपस्थिती मध्ये सदनाचे कामकाज पाहण्यासाठी उपसभापती निवडला जातो. आपला कार्यकाल संपण्यापूर्वी सभापती स्वच्छेने राजीनामा देऊ शकतो. किंवा सदन त्याच्यावर अविश्वाचा ठराव आणून पदावरून काढू शकते. त्यासाठी त्याला 14 दिवस आधी तशी पूर्वसूचना दयावी लागते. अविश्वासाचा ठराव सभासदत्व रद्द होणे किंवा मृत्यू होणे यापैकी कोणत्याही कारणाने सभापती पद रद्द झाले असेल तर नविन सभापतीची निवड घेतली जाते. व राज्यविधिमंडळाने ठरवलेले वेतन, भत्ते व सोयी उपलब्ध करून दिल्या जात. सभापती हा पक्षीय राजकारापासुन अलिप्त असतात.

( सभापतीचे ) अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे

1) विधानपरीषदेचे अध्यक्ष स्थान भूषविणे, नियमानुसार कामकाज चालवणे, सभागृहात शांतता आणि सुव्यवस्था कायम राखणे, सभागृहात भाषण करण्याची प्रश्न विचारण्याची, ठराव मांडण्याची परवानगी देणे 2) निरनिराळया कामासाठी. वेळ निश्चित करणे. 3) सभापतीच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या सदस्याला सदनाच्या बाहेर काढणे किंवा निलंबित करणे 4) सभागृहांच्या समित्यांचे अध्यक्ष व नियुक्त करावयाचे सदस्य नेमणे समित्यांची कार्य पद्धती ठरवून देणे. 5) सभागृह आणि सभासदांच्या विशेषाधिकाराचे रक्षण करणे. 6) गणसंख्येअभावी किंवा गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज चालविणे इत्यादी. विधानपरीषदेच्या सदस्यांच्या अनुपस्थित त्यांची सर्व कामे उपसभापती पाहतो. त्यावेळेस राज्यविधीमंडळाने ठरवलेले वेतन, भत्ते व सोयी, सवलतो उपसभापतीला प्राप्त होतात.

अधिवेशने :–

विधानसभेसोबतच विधानपरीषदेचेही देखील अधिवेशन आमंत्रित केले जाते. दोन्ही सभागृहांचे अधिवेशने वर्षातून कमीत कमी दोनदा झाली पाहिजे. असे बंधन आहे राज्यपाल विधिमंडळाचे अधिवेशन बोलवतो तेव्हा दोन्ही सभागृहांच्या बैठकी एकाच वेळी सुरू होतात. राज्यविधिमंडळाचे अधिवेशन स्थगित करण्याचा अधिकार राज्यपाला आहे. विधानपरीषदेच्या तरतुदी विधानसभेला ही लागू आहे.

गणसंख्या :–

विधानपरीषदेचे कामकाज चालविण्यासाठी जी संख्या सभासदांची आवश्यक असते. तिला गणसंख्या किंवा कोरम असे म्हणतात. गणसंख्येअसावी बैठक तहकूब करण्याचा अधिकार सभागृहांच्या सभापतीला आहे कामकाज चालू होण्यासाठी विधानपरीषदे मध्ये विधानसभेप्रमाणेच एकुण सभासदसंख्येच्या 1/10 किंवा 10 या पैकी जी संख्या जास्त असेल, तितके सभासद हजर असणे आवश्यक असते.

विधानपरीषदचे अधिकार आणि कार्य ( विधानपरीषदेचे ) :–

विधानपरीषदेला असलेले अधिकार हे अतिशय नाममात्र आणि औपचारीक स्वरूपाचे आहे. या सभागृहांचे अधिकार विलंब लावण्याचे स्वरूपाचे आहे. म्हणुन विधानपरीषदेचे वर्णन जगातील सर्वांत कमकुवत सभागृह अशा पद्धतीने केले जाते या सभागृहांच्या अधिकार आणि कार्याचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल.

1) विधीविषयक किंवा कायदेविषयक अधिकार :–

राज्यविधिमंडळाचे वरीष्ठ सभागृह या नात्याने जोपर्यंत विधेयकाला विधानपरीषदेची मंजूरी मिळत नाही. तोपर्यंत त्यांचे रूपांतर कायदयामध्ये होत नाही. मात्र त्याचा हा अधिकार नाममात्र स्वरूपाचा आहे. सर्वसामान्य विधेयकाला तीन महिण्यापर्यंत विलंब विधानपरीषद लावू शकतो मात्र तीन महिण्यानंतर त्या दुरूसत्या सुचवून अथवा नामंजूर करून ते विधेयक जर विधानपरीषदेने विधानसभेकडे पाठविले तर एकतर विधानसभा ते पुन्हा आहे त्या स्वरूपामध्ये

मंजूर करून पुन्हा ते विधानपरीषदेकडे परत पाठविते अशावेळेस एक महिण्याच्या आत विधानपरीषदेला त्याला मंजूरी दयावी लागते. आणि विधानपरीषदेचा निर्णय काही ही असला, तरीते विधेयक मंजूर झाले आहे असे समजून राज्यपालाच्या स्वाक्षरीसाठी पाठविले जाते. तसेच विधानपरीषदेने सुचविलेल्या दुरूसत्या विधानसभेने मंजूर केल्या पाहिजे असे बंधन देखील विधानसभेवर नाही. म्हणजेच सर्वसाधारण विधेयकाच्या बाबतीत फक्त चार महिण्यापर्यंत विलंब लावण्याचे कार्य विधानपरीषद करू शकते सर्वसामान्य विधेयकाची सुरूवात विधानपरीषदेत होऊ 'शकते मात्र अर्थ विधेयकाचा बाबतीत विधानपरीषदेला सुरूवातही करता येत नाही. आणि ते विधानसभेकडून मंजूर होउन आल्यानंतर केवळ 14 दिवसाच्या आत विधानपरीषदेला आपला निर्णय कळवावा लागतो.

2) शासनविषयक अधिकार :–

शासनविषयक अधिकाराअंतर्गत राज्यविधीमंडळाचे काही मंत्रो विधानपरीषदेच्या सभासदामधून घेतले जातात. विधानपरीषदेचे सभासद कोणत्याही मंत्र्यांना राज्यकारभाराबाबत प्रश्न उपप्रश्न विचारून त्यांची चौकशी करू शकतात. मंत्र्यांना या प्रश्नाची समाधानकारक उत्तरे सभागृहात उपस्थित राहून दयावी लागते. याव्यतिरीक्त काम तहकुबीचा ठराव, निंदामत्क ठराव, लक्षवेधी सुचना, कपात सुचना, इत्यादी मार्गांनी विधानपरीषद मंत्रीमंडळावर नियंत्रण ठेवू शकतो. परंतु अविश्वासाचा ठराव पारित करून मंत्रीमंडळाला पदावरून काढण्याचा अधिकार मात्र विधानपरीषदेला नाही.

अर्थविषयक अधिकार :–

आर्थिक क्षेत्रामध्ये विधानपरीषदेला जवळपास नगण्य स्वरूपाचे अधिकार आहे. परंतु तरीदेखील काही बाबतीत विधानपरीषदेला सत्ता आहे. जसे अंदाजपत्रक विधानसभेमध्ये सर्वप्रथम मांडल्या असे जरी असले तरी विधानपरीषदे मध्येदेखील त्यावर चर्चा घेणे आवश्यक असते. धनविधेयकामध्ये देखील विधानपरीषद काही दुरूसत्या सुचवू शकते, सुचना व शिफारशी करू शकते, व त्याच्या सुचना, शिफारशी मौलीक स्वरूपाच्या असतील तर, विधानसभेला त्याची दखल घ्यावीच लागते याव्यतिरीक्त विधानसभेचे सदस्य विधानपरीषदेत मंत्र्यांच्या आर्थीक व्यवहारावर बाबत प्रश्न–उपप्रश्न विचारले जाऊ शकतात. व या माध्यमातून जनतेला आर्थिक गैरव्यवहाराची माहिती मिळते असते.

4) इतर अधिकार :–

याशिवाय विधानपरीषदे–द्वारा विशिष्ट हीत संबंधाचे संरक्षण करण्याचे कार्य होत असते. विधानपरीषदेमध्ये विशिष्ट हितसंबंधाचे प्रतिनीधी असतात. त्यामुळे त्या हितसंबंधाकडे लक्ष वेधण्याचे काम विधानपरीषदेकडून केले जाते विधानपरीषदेमध्ये साहित्य, कला, विज्ञान, समाजसेवा इ. क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या तज्ञ अनुभवी व्यक्ती असतात त्यामुळे राज्यविधीमंडळाच्या विधीविषयक कार्याचा दर्जा टिकवून ठेवण्यास या सभागृहांची मदत होते.

विधानपरीषदेचे मुल्यांकन :–

घटकराज्यामध्ये विधानपरीषद असावी की नसावी हा एक वादग्रस्त ठरलेला आहे. 29 घटक राज्यांपैकी फक्त 7 घटक राज्यामध्ये विधानपरीषद आहे. आणि ती असणे किंवा नसणे हे सर्वेस्वी विधानसभेच्या मर्जीवर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे असे हे दुर्बल सभागृह नष्ट करून टाकण्यात यावे, अशी टिका राज्यशास्त्रातील काही लोकांनी केली आहे. कारण त्याच्या मते, विधानपरीषदेमध्ये पुन्हा विधानसभेच्याच कामाची पुनरावृत्ती होत असते. आणि अशा कामासाठी पुन्हा वळ आणि पैशांचा अपव्यय होत असतो. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशाला हे सभागृह परवडण्यासारखे नाही. तर या सभागृहांचा वापर सत्ताधारी पक्ष आपल्या लोकांची वर्णी लावण्यासाठी करत असता. तसेच यात देण्यात आलेले निरनिराळया हितसंबंधाचे प्रतिनिधित्व हे देखील दोषपूर्ण आहे. तसेच मुळात या सभागृहांचे अस्तित्व विधानसभेच्या मर्जीवर अवलंबून आहे. त्यामुळे हे सदन कुचकामाचे आहे अशी यावर टिका करण्यात येते. तर यांच्या समर्थनात देखील काही मुद्दे मांडले जातात. तसे असे की नियंत्रक, संशोधक व बांधक प्रभावासाठी द्विगृही विधीमंडळ असलेल्या देशात दुसरे सभागृह असलेच पाहिजे, असे म्हटल्या जाते. ब-याच वेळा विधानसभेकडून भावनेच्या भरात काही विधेयके घाईगर्दीने मंजूर केली जाण्याची शक्यता असते. मात्र यावर ब-याच प्रमाणात. नियंत्रण ठेवता येते. तसेच अलीकडे विधीमंडळाच्या वाढलेल्या कामामुळे एकाच सभागृहांवर कामाचा ताण पडतो अशावेळेस द्वितीय सभागृहामुळे हा कामाचा ताण हलका करता येतो. तसेच या सभागृहांमुळे विविध हितसंबंधाना प्रतिनिधितत्व मिळवून देणे फायदयाचे ठरते. तज्ज्ञ, विद्वान लोकांच्या नियुक्तीमुळे परीपक्व, अनुभवी सदस्यांचे हे सदन तसेच विचीरंचा दर्जा व चर्चेची पातळी उच्च असणारे हे सदन आवश्यक आहे. असे म्हटल्या जाते. जर विधानपरीषदेच्या रचनेमध्ये काही मुलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणले तर हे सभागृह उपयोगी करू शकते. पण त्याचबरोबर हेही तितकेच खरे आहे की, मोठया राज्यानाच हे सभागृह परवडते. छोटया राज्यासाठी हे परवडण्यासारखे नाही.

---